Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या संदर्भात शिक्षक-शिक्षणामध्ये रंगमंच आणि नाट्य पध्दतीची परिणामकारकता : एक विश्लेषणात्मक अभ्यास"

**संशोधिका**
**प्रा. भारती बाबाराव ठाकरे**
स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालय, वरुड, ता. वरुड, जि.अमरावती.

## सारांश

शिक्षक शिक्षणामध्ये गुणवत्तापूर्ण सर्जनशिल आणि विद्यार्थी केंद्रीत अध्यापनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध नाविण्यपूर्ण अध्यापन पद्धतीचा अवलंब केला जात आहे. त्यामध्ये रंगमंच हा एक प्रभावी शैक्षणिक दृष्टीकोन म्हणून उदयास आला आहे. शिक्षक शिक्षणामध्ये केवळ विषय ज्ञान पुरेसे नसून प्रभावी संवाद कौशल्य अध्यापन कौशल्य सर्जनशीलता आत्मविश्वास आणि विद्यार्थ्यांशी संवेदनशील संबंध निर्माण करण्याची क्षमता विकसित होणे आहे. या सर्व गुणाच्या विकासासाठी रंगमंच हे एक प्रभावी शैक्षणिक साधन आहे. रंगमंचीय उपक्रमाव्दारे शिक्षक प्रशिक्षणार्थीमध्ये अभिव्यक्ती क्षमता, नेतृत्व गुण, समस्या निराकरण कौशल्य सहकार्याची भावना, संवाद कौशल्य आत्मविश्वास, भावनिक संवेदनशिलता आणि वर्ग व्यवस्थापन यासारख्या व्यवसायीक कौशल्याचा विकास होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये कला एकात्मिक शिक्षण, अनुभवाधारित शिक्षण बहुविषयक शिक्षण आणि २१ व्या शतकातील कौशल्याच्या विकासावर विशेष भर देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक शिक्षणात रंगमंचाचा समावेश करणे अधिक आवश्यक ठरते. प्रस्तुत शोधन निबंधात शिक्षक-शिक्षणामध्ये रंगमंचाचे शैक्षणिक महत्व त्याचा शिक्षक-प्रशिक्षणार्थीच्या व्यावसायिक विकासावर होणारा परिणाम अध्यापन प्रक्रियेतील उपयोगीता आणि आधुनिक शिक्षक शिक्षणातील भूमिका याचे विश्लेषण करण्यातआले आहे. संशोधनातून असे दिसून येते की, रंगमंचाचा समावेश शिक्षकाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी साधन ठरतो. शिक्षक-प्रशिक्षणत रंगमंचाचा प्रभावी वापर केल्यास भावी शिक्षक वर्गातील वातावरण अधिक जीवंत आणि आनंददायी बनवू शकतात.

## प्रस्तावना :

शिक्षण ही एक जिवंत आणि गतिमान प्रक्रिया आहे. बदलत्या जगातील प्रवाहात पारंपारिक, एकतर्फी आणि व्याख्यान पद्धतीवर आधारित अध्यापन आता कालबाह्य ठरत आहे. शिक्षण ही केवळ अध्यापन कौशल्य विकसित करण्याची प्रक्रिया नसून ही एक संवादात्मक प्रक्रिया आहे. शिक्षक हा शिक्ष्ज्ञण प्रक्रियेतील प्रमुख घटक असून त्याच्याकडे प्रभावी अध्यापनासाठी विविध कौशल्य असणे आवश्यक आहे.

**शिक्षण-** शिक्षण ही केवळ अध्यापन कौशल्य विकसित करण्याची प्रक्रिया नसून भावी शिक्षकांमध्ये ज्ञान, कौशल्ये मुल्य सर्जनशिलता आणि व्यावसायीक क्षमता विकसित करण्याची व्यापक प्रक्रिया आहे. आधुनिक शिक्षण व्यवस्थेत शिक्षकाने केवळ विषयाचे ज्ञान देणे अपेक्षित नसून विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, संवाद, कौशल्य, सर्जनशिलता सहकार्य आणि मूल्याधारित सहकार्य आणि मूल्याधारित वर्तन विकसित करणे आवश्यक आहे. या उद्दिष्टांची प्रभावी पूर्तता करण्यासाठी रंगमंच हे अत्यंत परिणामकारक शैक्षणिक माध्यम मानले जाते. रंगमंच हा कला शिक्षण आणि अनुभव यांचा संगम आहे. भूमिका सादरीकरण नाट्यीकरण, संवाद, अभिनय प्रसंगरचना आणि अभिव्यक्ती यांच्या माध्यमातून शिखक प्रशिक्षणार्थी प्रत्यक्ष अनुभवातून शिकतात त्यामुळे अध्यापन अधिक जीवंत, विद्यार्थी केंद्रीत आणि परिणामकारक बनते. रंगमंच ही एक अशी कला

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

आहे जी व्यक्तीच्या सर्वांगीण विकासास चालना देते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अनुभवावर आधारीत शिक्षण, कला एकात्मिक शिक्षण बहुविषयकता आणि २१ व्या शतकातील कौशल्याच्या विकासावर विशेषभर देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण शिक्षणामध्ये रंगमंचाचे महत्व अधिक वाढते.

## संशोधनाची उद्दिष्टे :

शिक्षक शिक्षणामध्ये रंगमंचाची भूमिका स्पष्ट करणे.

नाट्य पध्दतीची शैक्षणिक उपयुक्तता अभ्यासणे

शिक्षक-प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्यावर होणाऱ्या पवरिणामाचे विश्लेषण करणे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या संदर्भात रंगमंचाचे महत्व स्पष्ट करणे.

## संशोधन पध्दती :

या अध्ययनासाठी गुणात्मक व विश्लेषणात्म संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. पुस्तके संशोधन लेख धोरणात्मक अहवाल शासकीय कागदपत्रो आणि संशोधन जर्नलमधील साहित्याचे विश्लेषण करण्यात आले.

## शिक्षक- शिक्षणाची संकल्पना :

शिक्षक शिक्षण म्हणजे शिक्षकाला आवश्यक ज्ञान, कौशल्य, मूल्य आणि व्यावसायीक क्षमता विकसीत करण्याची प्रक्रिया होय. यामध्ये अध्यापन कौशल्य, वर्ग व्यवस्थपन कौशल्य मूल्यकापन संवाद कौशल्य आणि विद्यार्थ्यांच्या गरजांची जाणीव यांचा समावेश होते.

## रंगमंचाची संकल्पना :

रंगमंच म्हणजे अभिनय, संवाद, हावभाव, संगीत, नृत्य आणि दृष्य, माध्यमामंच्या सहाय्याने विचार आणि भावना प्रभावीपणे सादर करण्याची कला होय. शिक्षणामध्ये रंगमंचाचा वापर अध्यापनाला जीवंत आणि अनुभवाधारित बनवतो.

## शिक्षक शिक्षणामध्ये रंगमंचामुळे होणाऱ्या कौशल्याचा विकास :

**प्रभावी संवाद कौशल्याचा विकास :** शिक्षकाच्या यशस्वी अध्यापनासाठी प्रभावी संवाद कौशल्य अत्यंत आवश्यक असते. रंगमंचामुळे प्रभावी आणि आत्मविश्वासपूर्ण बोलण्याची सवय लागते. आवाजातील चढ उतार, उच्चार, शब्द फेक, देहबोली आणि चेह:यावरील हावभव यांचा योग्य वापर करता येते.

**आत्मविश्वासाची वाढ :** अनेक प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांसमोर बोलण्यास किंवा अध्यापन करण्यास संकोच करतात. रंगमंचावर भूमिका सादर करतांना त्या मोठ्या समुहासमोर बोलण्याची संधी मिळते. सातत्याने सादरीकरण केलयामुळे भिती कमी होते आणि शिक्षकाचा आत्मविश्वास वाढतो.

**अध्यापन कौशल्ये प्रभावी बनतात :** रंगमंचीय क्रियाकलाप शिक्षकांना विषय प्रभावी मांडण्याची कला शिकवतात. विविध प्रसंग, भूममिका आणि कथांव्दारे विषय समजावून सांगण्याची क्षमता विकसीत होते. त्यामुळे अध्यापन अधिक रंजक अनुभवधारित आणि विद्यार्थी केंद्रीत बनते.

**सर्जनशीलता आणि कल्पना शक्तीचा विकास :** रंगमंच हा सर्जन शिलतेचा उत्कृष्ट मंच आहे. नाटक, लेखन, संवाद रचना, प्रसंग निर्मिती आणि भूमिका सादरीकरण या प्रक्रियेमध्ये विकसित होते यामुळे ते अध्यापनामध्ये कल्पनाशक्ती विकसित होते यामुळे ते अध्यापनामध्ये नवीन कल्पना आणि अभिनव उपक्रमांचा वापर करु शकतात.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**भावनिक बुध्दीमत्तमेचा विकास :** विविध भूमिका साकारतांना व्यक्तीला इतरांच्या भावना विचार आणि अनुभव समजवून घ्यावे लागतात. त्यामुळे सहानुभूती, संवेदनशीलता आणि भावनिक समज विकसीत होते. शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या समस्या आणि गरजा समजून घेण्यास ही क्षमता मदत करते.

**वर्ग व्यवस्थापन कौशल्याचा विकास :** रंगमंचायवर प्रेक्षकांचे लक्ष टिकवून ठेवण्यासाठी कलाकाराला सतत सजग राहावे लागते. त्याप्रमाणे शिक्षकांनाही वर्गातील विद्यार्थ्यांचे लक्ष अध्यापनाकडे केंद्रीत ठेवावे लागले. रंगमंचीय अनुभवामुळे शिक्षकांचे सादरीकरण कौशल्य वेळेचे व्यवस्थापन आणि वर्गावर नियंत्राण ठेवण्याची क्षमता वाढते.

**मूल्य शिक्षणाचा प्रसार :** नाट्य आणि प्रसंग नाट्याच्या माध्यमातून प्रामाणिकपणा, सहकार्य, सामाजिक जबाबदारी, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संरक्षण यासारखी मूल्य विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविता येतात. शिक्षक प्रशिक्षणामध्ये रंगमंचाचा वापर केल्याने मूल्याधिष्ठीत अध्यापनाची क्षमता विकसित होते.

**भाषिक कौशल्यांचा विकास :** संवाद, पाठांतर, वाचन, लेखन आणि सादरीकरण यामुळे भाषिक कौशल्य विकसित होतात. शिक्षकांची शब्द संपदा वाढते आणि भाषेचा प्रीाावी वापर करण्याची क्षमता निर्माण होते. ही कौशल्य अध्यापन प्रक्रियेमध्ये अधिक महत्वाची असते.

**अध्यापनातील नाविण्याला चालना :** रंगमंचीय २१ तंत्राचा वापर करुन शिक्षक अध्यापन अधिक मनोरंजक बनवू शकतात. भूमिका अभिनय प्रसंगनाट्य कथा सादरीकरण आणि अनुकरण तंत्र यामुळे विद्यार्थ्यांचा सहभागी वाढतो आणि शिकणे अधिक अर्थपूर्ण होती.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीला सहाय्य :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये कला-सलग्न शिक्षणावर भर देण्यात आला आहे. रंगमंचायच्या माध्यमातून अनुभवाधारित कौशल्याधारित आणि विद्यार्थी केंद्रीत अध्यापन शक्य होते त्यामुळे शिक्षक शिक्षणामध्ये रंगमंचाचा उपयोग करणे हे धोरणाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी उपयुक्त ठरते.

**शिक्षक शिक्षणात रंगमंचाचा उपयोग :**

**सुक्ष्म अध्यापन (Mini Teaching) :**

सुक्ष्म- अध्यापन ही शिक्षक प्रशिक्षणातील एक प्रभावी पध्दत आहे. यामध्ये शिक्षक, प्रशिक्षणार्थी मर्यादित वेळेत आणि मर्यादित विद्यार्थ्यासमोर विशिष्ट अध्यापन कौशल्याचा सराव करतात. रंगमचीय तंत्राचा वापर करुन प्रशिक्षणार्थी शिक्षक आपल्या आवाजाचा, हावभावाचा, देहबोली आणि सादरीकरण शैलीचा प्रभावी वापरत शिकतात. रंगमंचामुळे त्यांना आत्मविश्वासाने वर्गासमोर उभे राहण्याची सवय लागते.

**भूमिका अभिनय (Role Play) :**

भूमिका अभिनय ही शिक्षणातील एक महत्वाची अध्यापन पध्दती आहे. यामध्ये शिक्षक-प्रशिक्षणार्थी एखाद्या व्यक्तीची किंवा परिस्थितीची भूमिका साकारतात उदा.शिक्षक-विद्यार्थी, पालक-शिक्षक ऐतिहासिक व्यक्ती आणि सामाजिक समस्यांशी संबंधित भूमिका सादर करता येतात. यामध्ये विद्यार्थ्यांना विषयाचे प्रत्यक्ष अनुभवात्मक आकलन होते. शिक्षक-प्रशिक्षणमध्ये भूमिका अभिनयामुळे संवाद कौशल्य सहनुभूती, समसय निराकरण क्षमता आणि निर्णय क्षमता विकसीत होते.

**प्रसंगनाट्य (Dramatization) :**

प्रसंगनाट्य म्हणे एखाद्या पाठातील किंवा कथेतील प्रसंगाचे नाट्यमय रुपांतर करुन सादरीकरण करणे. इतिहास, भाषा, विज्ञान, समाजशास्त्र यासारख्या विषयातील संकल्पा प्रसंगनाट्याव्दारे अधिक जिवंत आणि आकर्षक पध्दतीने शिकविता येतात.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**कथा सादरीकरण:**

रंगमंचीय तंत्राचा वापर करुन शिक्षक कथा अधिक रंजक आणि परिणामकारक पध्दतीने सादर करु शकतात. आवाजातील चढउतार चहऱ्यावरील भाव, हालचाल आणि संवाद यांच्या सहाय्याने कथा विद्यार्थ्यांच्या मनावर प्रभाव टाकते यामुळे विद्यार्थ्यांची भाषा कौशल्य, कल्पना शक्ती आणि नैतिक मूल्य विकसीत होतात.

**शैक्षणिक नाटिका :**

विशिष्ट नाटिका ही विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तयार केलेली लघुनाटिका असते. पर्यावरण संरक्षण आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता यासारख्या शैक्षणिक नाटिका सादर करता येतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांना मनोरंजनासह शिक्षण मिळते. शिक्षक-प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक नाटिका तयार करतांना विषयाचे सखोल ज्ञान सर्जशीलता आणि प्रभावी सादरीकरण कौशल्य विकसीत करण्याची संधी मिळाली.

**कठपुतळी प्रयोग :**

कठपुतळी हा शिक्षणातील एक प्रभावी दृकश्राव्य प्रकार आहे. कठपुतळ्यांच्या माध्यमातून विविध शैक्षणिक संकल्पना, नैतिक मूल्य आणि समाजातील संदेश विद्यार्थ्यांपर्यंत सहज पोहचविता येतात. विशेषत: प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी कठपुतळी प्रयोग अत्यंत आकर्षक ठरतात.

**अनुकरण पध्दती :**

या पध्दतीमध्ये वास्तविक जीवनातील परिस्थितीचचे कृत्रिम वातावरण तयार करुन त्वा अनुभव दिला जातो. उदा. शाळेतील पालक-शिक्षक सभा, न्यायालय, ग्रामसभा किंवा मुलाखत प्रक्रिया यांचे अनुकरण करता येते. या प्रतिमुळे शिक्षक, प्रशिक्षणार्थ्यांना वास्तविक परिस्थितीचा अनुभव मिळतो.

**मुल्य शिक्षणासाठी उपयोग :**

रंगमंचाच्या माध्यमातून प्रामाणिकपणा सहकार्य देशभक्ती, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता आणि मानवता या सारखी मूल्य प्रभावीपणे शिकविता येतात. नाट्यरुप सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांवर भावनिक प्रभाव पडतो आणि मूल्यांचे आंतरिकीकरण सुलभ होते.

**समावेशक शिक्षणासाठी उपयोग :**

रंगमंच सर्व विद्यार्थ्यांना सहभागाची समान संधी प्रदान करतो. विविध क्षमता, पार्श्वभूमी आणि गरजा असलेलया विद्यार्थ्यांना नाट्यक्रिया कलापांमध्ये सहभागी करुन घेता येते. त्यामुळे समावेशकता, परस्पर सहकार्य आणि सामाजिक समज वाढते.

**रंगमंचामुळे विकसित होणारी शिक्षकांची कौशल्य :**

**प्रभावी संवाद कौशल्य :** रंगमंचावर अभिनय करतांना संवाद स्पष्ट शुध्द आणि प्रभावी मांडवा लागतो. त्यामुळे शिक्षकांची बोलण्याची शैली, शब्दोच्चार, भाषेची शुध्दता, अभिव्यक्ती, क्षमता विकसीत होते. वर्गामध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना ही कौशल्य उपयुक्त ठरतील.

**सादरीकरण कौशल्य :** शिक्षकाला वर्गात विषय आकर्षक पध्दतीने सादर करावा लागतो. रंमंचीय अनुभवामुळे आवाजाचा योग्य वापर चेहऱ्यावरील हावभाव देहबोली आणि मंचावरील उपस्थिती याचा विकास होतो.

**नेतृत्व क्षमता :** या प्रक्रियेत नेतृत्व गुण विकसीत होता. शिक्षकांना विविध शालेय उपक्रमांचे नियोजन, व्यवस्थापन आणि मार्गदर्शन करतांना नेतृत्व कौशल्याचा उपयोग होतो. रंगमंच शिक्षकामध्ये निर्णय क्षमता आणि जबाबदारीची भावना निर्माण करते.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**सर्जनशीलता :** रंगमंच हा सर्जनशीलतेच्या स्त्रोत आहे. कथा संवाद दृष्य रचना अभिनय आणि प्रसंग निर्मिती या मधून नवीन कल्पना रुचतात. शिक्षक आपल्या अध्यापनामध्ये नवनवीन उपक्रम आणि अध्यापन तंत्राचा वापर करुन अध्यापन परिणामकारक बनवू शकतात.

**वर्ग व्यवस्थापन कौशल्य :** रंगमंचावर प्रेक्षकाचे लक्ष टिकवून ठेवण्याची कला शिक्षकांना वर्ग व्यवस्थापनासाठी मदत करते. विद्यार्थ्यांना शिकण्यामध्ये सक्रीय ठेवणे, शिस्त राखणे, सकारात्मक वातावरण निर्माण करणे यासाठी रंगमंच उपयुक्त आहे.

**आत्मविश्वास :** रंगमंचावर सादरीकरण करतांना मोठ्या समुहासमोर बोलण्याचा सराव होतो. ज्यामुळे भिती संकोच कमी होते. आत्मविश्वासपूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांवर सकारात्मक प्रभाव पाडतात.

**भावनिक समज आणि सहानुभूती :** विविध व्यक्ती रेखा साकारतांना ज्या पात्रांच्या भावना विचार आणि अनुभव समजून घ्यावे लागतात. ज्यामुळे शिक्षकांमध्ये सहानुभूती संवेदनशीलता आणि भावनिक समज वाढते. विद्यार्थ्यांच्या अडचणी आणि भावनिक गरजा ओळखण्यासाठी ही कौशल्य महत्वाची आहे.

**निरीक्षण मूल्यमापन कौशल्य :** रंगमंचीय सादरीकरणामध्ये स्वत:च्या इतरांच्या कामाचे निरीक्षण करुन त्याचे मूल्यमापन केले जाते. त्यामुळे शिक्षकांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे अचूक निरीक्षक आणि वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्याची क्षमता विकसीत होते.

**व्यक्तीमत्व विकास कौशल्य :** रंगमंचामुळे शिक्षकांचे व्यक्तिमत्वच सर्वांगीण विकसीत होते. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास शिस्त, संयम, सकारात्मकता प्रभावी संवाद आणि सामाजिकज जाणीव निर्माण होते. हे गुण एक आदर्श शिक्षक घडविण्यासाठी आवश्यक असते.

**नवोपक्रमशील अध्यापन कौशल्य :** रंगमंचाच्या माध्यमातून शिक्षक भूमिका अभिनव प्रसंगनाट्य, कथा-कथन, अनुकरण आणि प्रकल्प आधारीत अध्यापन या सारख्या नवोपक्रमशील पध्दतीचा वार शिकतात. त्यामुळे अध्यापन अधिक विद्यार्थी केंद्रीत आणि अनुभवाधारीत बनते.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि रंगमंचाचे महत्व :

**कला-एकात्मिक शिक्षण :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये कला एकात्मिक शिक्षणाला अध्यापनाची एक महत्वाची पध्दत म्हणून मान्यता देण्यात आली आहे. नाटक, अभिनय, संगीत, चित्रकला आणि नृत्य या सारख्या कला विषयाच्या माध्यमातू अध्यापन अधिक प्रभावी आनंददायी आणि अनुभवाधारीत करण्यावर भर देण्यात आला आहे. शिक्षक शिक्षणात रंगमंचाचा समावेश केल्याने शिक्षक प्रशिक्षणार्थी विषयातील संकल्पना नाट्यरुपाने सादर करण्याचे कौशल्य आत्मसात करतात. यामुळे अध्यापन अधिक सर्जनशिल, विद्यार्थी केंद्रीत बनते.

**अनुभवावावर आधारीत शिक्षण :** NEP २०२० मध्ये Learning by doing या तत्वावर विशेष भर देण्यात आला आहे. रंगमंच आणि नाट्य पध्दती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृती, भूमिका निर्वाह आणि सहभागातून शिकण्याची संधी देतात. शिक्षक प्रशिक्षणार्थीना प्रत्यक्ष अध्यापनातील परिस्थितीचा अनुभव मिळतो. ज्यामुळे त्यांचे ज्ञान अधिक सखोल आणि दिर्घकालीन बनते.

**विद्यार्थी केंद्रीत अध्यापन :** धोरणानुसार शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेला दिशा देणारा मार्गदर्शक आहे. नाट्य पध्दतीमध्ये विद्यार्थी सक्रीय सहभाग घेतात. प्रश्न विचारतात, भूमिका साकारतात आणि स्वत: अनुभवातून शिकतात.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**शिक्षक शिक्षणाची पुनर्रचना :** NEP २०२० मध्ये शिक्षक-शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, बहुविषयक आणि कौशल्याधारीत करण्यावर भर देण्यात आला आहे. शिक्षक-प्रशिक्षणामध्ये रंगमंच नाट्य, कला आणि सर्जनशील अध्यापन तंत्राचा समावेश करुन भावी शिक्षकांना तयार करण्याची अपेक्षा आहे.

**२१ व्या शतकातील कौशल्याचा विकास :** संवाद कौशल्य चिकीत्सक विचार सर्जनशीलता समस्या सोडविण्याची क्षमता नेतृत्व, सहकार्य आणि नवोपक्रमशीलता ही २१ व्या शतकातील आवश्यक कौशाल्य मानली जाता. नाट्य पध्दतीव्दारे ही कौशाल्य प्रभावीपणे विकसीत होतात. शिक्षक सक्षम बनतो.

**भारतीय कला संस्कृती आणि मूल्यांचे संवर्धन :** NEP २०२० भारतीय संस्कृती लोककला आणि परंपरांचे जतन करण्यावर भर देते. लोकनाट्य एकांकीका, कथाकथन आणि इतर रंगमंचीय उपक्रमाव्दारे शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जाणीव राष्ट्रीय अभिमान आणि मूल्यांची रुजवण करु शकतात.

**समावेशक शिक्षण :** विविध सामाजिक, भाषिक आणि शैक्षणिक पार्श्वभमतीच्या विद्यार्थ्यांना समान संधी देणे NEP २०२० चे उद्दिष्टे आहे. नाट्यपध्दती प्रत्येक विद्यार्थ्याला सहभागाची संधी देते. आत्मविश्वास वाढवते, सहकार्याची भावना विकसीत करते. त्यामुळे समवेशक शिक्षण अधिक प्रभावी होते.

**आनंददायी आणि सहभागात्मक शिक्षण :** NEP २०२० मध्ये तणावमुक्त, आनंददायी आणि सहभागात्मक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. नाट्य आधारीत अध्यापनामुळे शिकण्यामध्ये उत्साह आनंद आणि जिज्ञासा निर्माण होते.

**संवाद कौशल्य आणि व्यक्तीमत्व विकास :** रंगमंचामुळे शिक्षक प्रशिक्षणार्थींचे स्पष्ट बोलणे प्रभावी सादरीकरण योग्य देहबोली, आत्मविश्वास आणि नेतृत्व क्षमता विकसीत होतो. ही कौशल्य प्रभावी अध्यापनासाठी अत्यावश्यक आहेत.

**शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमतांचा विकास :** NEP २०२० मध्ये शिक्षकांना सतत व्यावसायिक विकास करण्यावर भर दिला आहे. नाट्य पध्दतीचा वापर केल्याने शिक्षकांचे अध्यापन, नियोजन, वर्ग व्यवस्थापन, सर्जनशीलता मूल्यांकन आणि नवोपक्रमशीलता वाढते. यामुळे शिक्षक अधिक परिणामकारक आणि व्यावसायीकदृष्ट्या सक्षम बनतो.

**निष्कर्ष :** वरील विश्लेषणात्मक अभ्यासक्रमावरुन असे स्पष्ट होते की, शिक्षक-शिक्षणामध्ये रंगमंच आणि नाट्यपध्दती ही केवळ सहशालेय किंवा सांस्कृतिक उपक्रम नसून प्रभावी अध्यापन-अध्ययन प्रक्रियेचे महत्वपूर्ण माध्यम आहे. रंगमंचाच्या माध्यमातून शिक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये संवाद कौशल्य, आत्मविश्वास, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, नेतृत्व, सहकार्य, वर्ग व्यवस्थपन, भावनिक संवेदनशीलता आणि समस्या सोडविण्याची क्षमता यासारख्या व्यवसायीक कौशल्यांचा सर्वांगीण विकास होतो. परिणामी शिक्षक अधिक परिणामकारक नवपक्रमशील आणि विद्यार्थी केंद्रीत अध्यापन करण्यास सक्षम होतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अनुभवाधारीत शिक्षण, कला, एकात्मिक शिक्षण, समावेशक शिक्षण बहुविषयक दृष्टीकोन २१ व्या शतकातील कौशल्यांचा विकास आणि शिक्षकांच्या सतत व्यावसायिक विकासावर विशेष भर देण्यात आला आहे. या सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी रंगमंच आणि नाट्यपध्दती प्रभावी साधन म्हणून कार्य करतात. ज्यामुळे शिक्षक-शिक्षण संस्थांनी त्यांच्या अभ्यासक्रमात रंगमंच आणि नाट्यपध्दतीचा नियोजनबध्द व सातत्यपूर्ण समावेश करणे आवश्यक आहे तसेच शिक्षक प्रशिक्षणार्थींसाठी नाट्य कार्यशाळा, भूमिका निर्वाह, सुक्ष्म अध्यापनामध्ये नाट्यतंत्रांचा वापर आणि कला-एकात्मिक अध्यापनाचे नियमीत प्रशिक्षण आयोजित करणे गरजेचे आहे. अशा उपक्रमांमुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची उद्दिष्टे प्रभावीपणे साध्य हातील आणि ज्ञानसमृध्द मूल्यनिष्ठ, सर्जनशील, संवेदनशील व व्यावसायिकदृष्ट्या सक्षम शिक्षक घडण्यास महत्वपूर्ण हातभार लागतात.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## शिफारशी :

शिक्षक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात रंगमंच आणि नाट्य पध्दतीचा समावेश करावा.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार कला एकात्मिक आणि अनुभवाधारीत शिक्षणाला प्राधान्य द्यावे.

शिक्षक-शिक्षण संस्थानी नियमीत नाट्य कार्यशाळा प्रशिक्षण कार्यक्रम आणि परिसंवाद आयोजित करावेत.

सुक्ष्म अध्यापन, सराव अध्यापन आणि शालेय इंटनशिपमध्ये नाट्यतंत्रांचा वापर वाढवावा.

शिक्षक-प्रशिक्षणार्थीमध्ये संवाद, कौशल्य, आत्मविश्वास, नेतृत्व सर्जनशीलता आणि वर्ग व्यवस्थापन कौशल्ये विकसीत करण्यासाठी रंगमंचीय उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे.

लोकनाट्य, एकांकीका, कथाकथन आणि इतर भारतीय नाट्यपरंपरांचा अध्यापनामध्ये समावेश करुन भारतातील कला, संस्कृती आणि मूल्यांचे संवर्धन करावे.

रंगमंच आणि नाट्ययपध्दतीच्या परिणामकारकतेवर अधिक अनुभवाधारीत आणि कृती संशोधन करण्यास शिक्षक व संशोधनाकांना प्रोत्साहन द्यावे.

शिक्षक शिक्षणामध्ये डिजीटल रंगमंच, इ-नाट्य (Digital Drama) आणि माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) यांचा समान्वित वापर वाढवावा.

या शिफारशीची प्रभावी अंमलबजावणी केल्यास राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची उद्दिष्टे साध्य करण्यास मदत होईल तसेच शिक्षक, शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण कौशल्याधारीत विद्यार्थी केंद्रीत बनून सक्षम सर्जनशील आणि व्यावसायिकदृष्ट्या सक्षम शिक्षक घडविण्यास हातभार लागेल.

## संदर्भ ग्रंथ सुची :

अग्रवाल जे.सी. (२०१८) शैक्षणिक तंत्रज्ञान नवी दिल्ली :- विकास पब्लिशिंग हाऊस.

भट वि.डी. (२०१९) शिक्षणशास्त्रे, पुणे निम्पनुतन प्रकाशन.

पाटील डी. डी. (२०२१) अध्यापन पध्दती आणि शैक्षणिक तंत्रज्ञान पुणे : विद्या प्रकाशन

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण परिषद (MSCERT) २०२१ शिक्षक प्रशिक्षण संदर्भ साहित्य पुणे : MSCERT

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (२०२३) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ नवी दिल्ली : NCERT

Teacher Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985